# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:29.06.2025** **वार:रविवार**

---

1. भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संवाद
2. मन की बात या कार्यक्रमाचा आज 123 वा भाग प्रसारित होणार
3. निवडणुकीत मोबाईल आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून ई-मतदान प्रणालीची प्रक्रिया बिहारमध्ये यशस्वी आणि
4. महिला क्रिकेटमध्ये पहिल्या वीस षटकांच्या सामन्यात भारताकडून इंग्लंडचा 97 धावांनी पराभव.

**<u>शुभांशु शुक्ला</u>**

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात असणारे भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संवाद साधला. 'भारतापासून तू खूप दूर असलास, तरी भारतीयांच्या जवळ, त्यांच्या हृदयात असून तुझ्या या प्रवासानं नव्या युगाचा शुभारंभ केला आहे,' अशा शब्दात पंतप्रधानांनी शुभांशु यांचं कौतुक करून त्यांना त्यांच्या मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या.

भारताचं प्रतिनिधीत्व करताना आपल्याला अभिमान वाटत असल्याची भावना शुभांशु यांनी व्यक्त केली. तसंच मी कधी अंतराळवीर होईन, असं मला वाटलं नव्हतं असं सांगत शुक्ला यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. ॲक्सिओम 4 मोहिमेअंतर्गत बुधवारी अमेरिकेतल्या फ्लोरिडा इथल्या केनेडी स्पेस सेंटरमधून अवकाशात पाठवण्यात आलेल्या यानातल्या चमूत शुक्ला यांचा समावेश आहे. ऐकुया या संवादाचा काही अंश.....

**तबियत ठीक है।....**

**जी प्रधानमंत्री जी बहुत बहुत धन्यवाद आपकी विशेष का और एक सौ चालीस करोड़ मेरे देशवासियों के विशेष का मैं यहाँ बिल्कुल ठीक हूँ, सुरक्षित हूँ आप सब के आशीर्वाद और प्यार की वजह ऐसी बहुत अच्छा लग रहा है। बहुत नया एक्सपीरियंस है ये और कहीं न कहीं बहुत सारी चीज़ें ऐसी हो रही है जो दर्शाती है की मैं और मेरे जैसे बहुत सारे लोग हमारे देश में और हमारा भारत किस दिशा में जा रहा है। ये जो मेरी यात्रा है पृथ्वी से ऑर्बिट की चार सौ किलोमीटर तक की जो छोटी सी यात्रा है ये सिर्फ मेरी नहीं है। मुझे लगता है कहीं ना कहीं हमारे देश की भी यात्रा है बेकाउस जब मैं छोटा था मैं कभी सोच नहीं पाया कि मैं एस्ट्रोनॉट बन सकता हूं। लेकिन मुझे लगता है आपके नेतृत्व में आज का भारत ये मौका देता है और उन सपनों को साकार करने का भी मौका देता है। तो ये बहुत बड़ी उपलब्धि है मेरे लिए और मैं बहुत गर्व फील कर रहा हूं कि मैं यहां पे अपने देश का प्रतिनिधित्व कर पा रहा हूं। धन्यवाद प्रधानमंत्री।**

**मन की बात**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांसी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा 123 वा भाग असून आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑनएअर या मोबाईल ॲपवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**संविधान पार्क**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या परिसरात संविधान उद्देशिका उद्यान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं लोकार्पण काल सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई तसंच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. या उद्यानाच्या माध्यमातून संविधानातील मौलिक विचार या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह लोकांपर्यंत पोहोचतील असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

तत्पूर्वी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात भारताचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्विकारण्याचा आणि त्यानंतर पहिल्याच नागपूर भेटीत संविधान उद्देशिका पार्कच्या उद्घाटनाचा योग आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. उद्देशिका हा संविधानाचा गाभा असून उद्देशिकेतील मुल्यांचा अंगीकार देशातील नागरिकांनी केल्यास, देशातील 90 टक्के प्रश्न कायमचे सुटतील, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात बोलताना केलं.

**बिहार**

बिहारमध्ये, सहा नगर पंचायतींची सार्वत्रिक आणि 36 इतर नगरपालिका प्राधिकरणांच्या पोट निवडणूकीसाठी काल अंदाजे 62 पूर्णांक 41 टक्के मतदान झालं. या निवडणुकीत बिहारने मोबाईल आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून ई-मतदान प्रणालीची प्रक्रिया यशस्वीरित्या पार असून आकाशवाणीशी बोलताना, राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद यांनी सांगितले की, ई मतदानासाठीची 70 टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांची उपस्थिती होती. ई-मतदान प्रणालीची मतदान केंद्रांशी तुलना करता अधिकाधिक मतदार त्यांच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी पुढे येतात. मतदान केंद्रांवर 54.63 टक्के मतदान नोंदवले गेले.

**भारत-मृत्युदर**

पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्युदरात भारतानं 78 टक्के घट नोंदवली आहे, जागतिक स्तरावर ही घट 61 टक्के आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्याकडून....

**संयुक्त राष्ट्रांच्या बाल मृत्युदर अंदाज गट 2024 च्या अहवालानुसार, नवजात बालकांच्या मृत्युदरातही जागतिक स्तरावर 54 टक्क्यांच्या तुलनेत 70 टक्क्यांनी घट झाली आहे. लसीकरण व्याप्ती सुधारण्यावर सतत लक्ष केंद्रित करून, भारतानं वंचित लोकसंख्येपर्यंत पोहोचण्यासाठी सक्रिय आणि समावेशक दृष्टिकोन स्वीकारला असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. लसीकरण हा एक सर्वात शक्तिशाली आणि**

**परवडणारा सार्वजनिक आरोग्य उपाय आहे. भारतात सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाद्वारे दरवर्षी 2 कोटी 90 लाख गर्भवती महिला आणि 2 कोटी 60 लाख बालकांना मोफत लसीकरण केलं जातं. जीवरक्षक लसींच्या वाढलेल्या संख्येमुळं अतिसार, न्यूमोनिया, मेंदूज्वर आणि एन्सेफलायटीसमुळे मुलांमधील मृत्यू आणि विकृती कमी करण्यासाठी झालेला परिणामही स्पष्टपणे दिसून येत आहे. लसीकरण मोहिमेच्या निरंतर अंमलबजावणीमुळं, भारतातील एकंदर लोकसंख्येतील शून्य मात्रा म्हणजे एकही लस न दिलेल्या बालकांचं प्रमाण 2023 मधील 11 शतांश टक्क्यांवरून 2024 मध्ये 6 शतांश टक्क्यांपर्यंत कमी झालं आहे. बाल आरोग्याचं हे जगासाठी चांगलं उदाहरण असल्याचं संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालआरोग्य विषयक समितीच्या अहवालात म्हटलं आहे. राष्ट्रीय लसीकरण दिवसाद्वारे भारतानं 2014 पासून पोलिओमुक्त देश हा दर्जा टिकवला आहे.**

**<u>कामगार संघटना</u>**

भारताने सामाजिक सुरक्षेची व्याप्ती वाढली असून ती आता देशभरातील 94 कोटींहून अधिक नागरिकांपर्यंत पोहोचली असल्याची माहिती कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली आहे. समाज माध्यमांवर मांडविया यांनी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे महासंचालक गिल्बर्ट होंगबो यांचे आभार मानले आहेत. होंगबो मजबूत आणि समावेशक सामाजिक सुरक्षा जाळे तयार करण्याच्या भारताच्या परिवर्तनकारी प्रवासाची दखल घेतली आणि त्याचे कौतुक केले. भारताची सामाजिक सुरक्षा व्याप्ती 2019 मध्ये जवळजवळ 25 टक्क्यांवरून 2025 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 64 टक्क्यांपर्यंत वाढली आहे.

**<u>भूकंप</u>**

पाकिस्तानला आज पहाटे 5 पूर्णांक 2 रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. भारताच्या राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार या भूकंपाचे केंद्रबिंदू मुलतान शहरापासून 149 किमी पश्चिमेला होते. पाकिस्तानमध्ये गेल्या 12 जून रोजी 4 पूर्णांक 6 रिख्टर आणि त्यानंतर अफगाणिस्तानच्या हिंदूकुश प्रदेशात 4 पूर्णांक 7 रिख्टर क्षमतेचा भूकंप झाला. आजच्या घटनेत कोणतेही नुकसान किंवा जीवितहानी झाल्याचं अद्याप वृत्त नाही.

**<u>सर्बिया</u>**

सर्बियाची राजधानी बेलग्रेडमध्ये हजारो विरोधकांनी पोलीसांशी संघर्ष करत आपला विरोध दर्शवला असून या निदर्शनांच नेतृत्व विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी केले होते. संसदीय निवडणुकांची मागणी तसंच सरकारावर भ्रष्टाचार आणि दडपशाही नियमांचा आरोप करत ही निदर्शने करण्यात येत आहेत. गेल्या आठ महिन्यांच्या सततच्या निदर्शनानंतरही सरकारनं निवडणुकांच लवकर आयोजन करण्यास नकार देत, प्रदर्शकांवर विदेशी प्रभाव असण्याचा आरोप केले आहेत. माध्यमं आणि विद्यापीठांवर कारवाई करण्यात येत आहे. आंदोलनाच्या आधी, पोलीस अनेक लोकांना अटक केली आणि शहरात प्रवास रोखला आहे.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये काल इंग्लंडमधील ट्रेंट ब्रिज इथं झालेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या वीस षटकांच्या सामन्यात भारताने इंग्लंडचा 97 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने 5 बाद 210

धावा केल्या. क्रिकेटच्या या प्रकारात स्मृती मानधनाने कारकीर्दीतील पहिले शतक ठोकताना तडाखेबंद 112 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल इंग्लंडचा 113 धावांवर बाद झाला. नॅट सायव्हर-ब्रंटने 42 चेंडूत 66 धावा केल्या. भारताकडून श्री चरणीने 4 बळी घेतले. स्मृती मानधनाला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**बॅडमिंटन**

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या तन्वी शर्माने काल युक्रेनच्या पोलिना बुरहोवाचा 21-14, 21-16 असा पराभव करत, महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. सध्या जागतिक क्रमवारीत 66 व्या क्रमांकावर असलेल्या तन्वीने संपूर्ण स्पर्धेत उच्च क्रमवारीत असलेल्या खेळाडूंना पराभूत केलं आहे. तन्वीचा अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत 21 व्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या बेईवेन झांगशी सामना होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता सुरू होणार आहे.

**ढगफूटी**

उत्तराखंडमधीलउत्तरकाशी जिल्ह्यात, बारकोट तहसीलमधील सिलाई बंदजवळ ढगफुटीझाल्याने बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी नऊ कामगार बेपत्ता झाले आहेत. मदत आणि बचावकार्य सुरू असून काल रात्रीपासून पावसामुळे राज्यातील विविध भागात सामान्य जनजीवनविस्कळीत झालं आहे.

**हवामान**

हवामान विभागान उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशात मोठ्या पावसाची शक्यता व्यक्त केली असून पुढील 6 दिवसांमध्ये कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रे, आणि गुजरातमध्ये साधारण परिस्थितीचीही अंदाज व्यक्त केलं आहे. तसंच देशाच्या पश्चिम, उत्तर-पश्चिम, आणि उत्तर-पूर्व भागांमध्ये येत्या 6 दिवसांत हलका ते मध्यम पावसाची शक्यता व्यक्त केली आहे .

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल,
## नमस्कार